टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
*अटी लागू
टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
www.tjsbbank.co.in
Toll Free: 1800 266 3466 / 1800 223 466

ज्येष्ठांनो, असा वाचवा कर

चित्र : एआय

सीए संजीव गोखले

ज्येष्ठनागरिकांना प्राप्तिकर भरताना करमुक्त उत्पन्न मर्यादा अधिक होती; तसेच काही गुंतवणूक केल्यास वजावटीही मिळत होत्या. त्यामुळे करबचत करणे शक्य होते. पण, आता नव्या कर पर्यायात वजावटी नाहीत. मग कसा वाचवायचा कर? ते आता पाहू.

सुधारित नव्या कर पर्यायात कराचे दर आणि स्लॅब असे आहेत की, जुन्या कर पर्यायात मिळणाऱ्या साधारण चार लाखांपर्यंतच्या वजावटी नाही मिळाल्या, तरी नव्या कर पर्यायात कमी कर भरावा लागतो. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना जुन्या कर पर्यायात मिळणाऱ्या बँकेच्या व्याजवरील ५०००० रुपयांची वजावट, वैद्यकीय विम्यात रु. ५००००, कलम ८०सी अंतर्गत दीड लाख वजावट, इत्यादी एकत्रित घेतल्या. तरी नवीन कर पर्यायात कर कमी लागेल. याचा अर्थ करबचत करण्यासाठी आता गुंतवणूक करणे जरूरीचे नाही. फक्त नवा कर पर्याय स्वीकारायचा...

नवा कर पर्याय स्वीकारून कर कमी भरता येईल, पण या व्यतिरिक्तही काही करबचत शक्य आहे का, असा प्रश्न नेहमी विचारला जातो. त्यासाठी कसे कर नियोजन करता येईल, त्याचा विचार करू. सर्वप्रथम म्हणजे म्युच्युअल फंडात गुंतवणूक असेल, तर नियमित उत्पन्न लाभांश स्वरूपात न घेता ठरावीक युनिट दर महिन्याला विकून पैसे खात्यात जमा होतील, असा पर्याय निवडा. याला सिस्टीमॅटिक विड्रॉवल प्लान (एसडब्ल्यूपी) असे म्हणतात. यात इक्विटी फंडात वार्षिक १,२५,००० रुपये नफा करमुक्त आहे. त्यामुळे मूळ करमुक्त उत्पन्नाच्या तीन लाख या मर्यादेच्यावर सव्वा लाख रुपये करमुक्त होतील. पती-पत्नी दोघेही ही सवलत घेऊ शकतात.

म्युचुअल फंडांत गुंतवणूक नाही; पण शेअर्समध्ये आहे आणि त्यात चांगला नफा झालेला असेल, तर तेही ठरावीक शेअर विकून वरीलप्रमाणे सव्वा लाख करमुक्त भांडवली नफा मिळवून दर महिन्याला लागणारे पैसे कमवू शकतात.

करमुक्त व्याज मिळणारे रोखे नेहमी बाजारात उपलब्ध असतात. त्यात गुंतवणूक करा. यामुळे मिळणारे व्याज साधारण बँकेतील व्याजाएवढे असले, तरी कर लागत नाही. शिवाय हे रोखे बाजारात खरेदी करताना जास्त रक्कम द्यावी लागते. रोखे मुदत संपल्यावर कमी रक्कम मिळाली, तर झालेले नुकसान मिळणाऱ्या करमुक्त व्याजाच्या तुलनेत खूपच कमी असते. हे नुकसान इतर भांडवली नफ्यासमोर समायोजित करता येते व कर वाचवता येतो. ज्येष्ठ नागरिकांना पगाराचे उत्पन्न नसल्याने या पर्यायाचा उत्तम उपयोग करता येईल.

करबचत होणार नसली, तरी 'पीपीएफ'मध्ये गुंतवणूक करावी. यात मिळणारे व्याज करमुक्त असते. गरज लागेल तसे काही पैसे 'पीपीएफ'मधून काढता येतील. या रकमेवर कोणताही कर भरावा लागत नाही; तसेच राष्ट्रीय पेन्शन योजनेत गुंतवणूक केल्याने मुदतीनंतर मिळणारी ६० टक्के रक्कम करमुक्त असते. याशिवाय दरमहा पेन्शनही मिळेल.

ज्येष्ठ नागरिकांना नातवंडे असतील आणि ती १८ वर्षांच्या वर असतील, तर त्यांच्या नावे पैसे गुंतवल्यास उत्पन्न त्या नातवंडांचे म्हणून धरले जाईल. ती कमवायला लागेपर्यंत त्यांनाही कर लागणार नाही; तसेच काही प्रमाणात संपत्ती विभाजन करण्याची सुरुवात करता येईल. अर्थात यासाठी परस्पर विश्वास आणि सामंजस्य आवश्यक आहे.

बाजार धरून ठेवेल तेजी

चित्र : एआय

कंपनीचे नाव	सध्याचा भाव (रुपये)	५२ आठवडे अपेक्षित	भाव (रुपये)	कालावधी कमाल/किमान
आरव्हीएनएल	४६४	६४७/१६५	६००	३-६ महिने
भारत फोर्ज	१,३५५	१८२६/१०६३	१,८५०	६-९ महिने
प्रेस्टिज	१,७३८	२०७२/९६८	२,२००	३-६ महिने
चोला इन्व्हेस्ट फायनान्स	१,२७५	१६५०/१०११	१,५००	१-६ महिने
स्टेट बँक ऑफ इंडिया	८६४	९१२/६००	१,१००	६-१२ महिने

केदार ओक
सेबी नोंदणी क्रमांक INH000001055

गेल्या आठवड्यातील काही बातम्यांनी सर्वांच्या मनात थोडी काळजी म्हणा किंवा चिंता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्या सर्वच बातम्या प्रामुख्याने भारताच्या आर्थिक क्षेत्राशी निगडित होत्या. त्यानंतर शुक्रवारी जाहीर झालेल्या द्विमासिक आर्थिक धोरणाने त्या सर्व बातम्यांना दुजोरा दिला. त्यामुळे या सर्वांची नोंद घेत मुंबई आणि राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक ८१,७०९ (-५६) / २४,६७७ (-३०) असा नकारात्मक बंद झाला. त्या महत्त्वाच्या नोंदी खाली देत आहे...

- सेवा क्षेत्रातील वाढीचा वेग मंदावला.
- रुपया आणखी खोलात.
- देशावरील बाह्यकर्ज ६४७ अब्ज डॉलरवर.
- अन्नधान्याचा वाढता महागाई दर
- अर्थव्यवस्था वाढीचा दर ७.२ टक्क्यांवरून ६.६ टक्क्यांवर घसरण्याची शक्यता.
- रेपो रेट कमी न करता सीआरआरमध्ये चार वर्षांनंतर कपात.
- अर्थमंत्र्यांनी केलेला शाब्दिक खेळ (दुसरी सहामाही सिस्टीमॅटिक स्लो डाउन दाखवत नसून फक्त वाढीव मागणीत घट दाखवत आहे.)
- वार्षिक आधारावर वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनात ८.५ टक्के वाढ.

मागील आठवड्यात बाजारातील हालचालीवर लक्ष टाकल्यास असे लक्षात येईल की, या सर्वांची बाजाराला पूर्वकल्पना आली होती. त्यामुळे या बातम्यांपूर्वीच बाजाराने गेल्या दीड महिन्यात १० टक्के करेक्शन देऊन समतोल साधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वरील बातम्यांनंतर चार दिवस तेजी दाखवून बाजार एकच दिवस खाली आला. मागील आठवड्यात पुन्हा एकदा संरक्षण, रिअल इस्टेट, बँक आणि रेल्वे क्षेत्रात बरीच उलाढाल दिसून आली.

दुसरी महत्त्वाची गोष्ट बाजारात दिसून आली ती म्हणजे, परदेशी वित्तसंस्था बाजारात करत असलेली खरेदी. गुंतवणूकदारांनी डिसेंबर २४च्या आकडेवारीवर नजर टाकल्यास हे लक्षात येईल. त्यामुळे बाजार ठरावीक पातळी धरून आहे. त्याच सुमारास मॉर्गन स्टॅनली आणि एका परदेशी वित्तसंस्थेने बाजाराबद्दल केलेले भाकीत. ते म्हणजे, पुढील वर्षी २०२५च्या अखेरीस सेन्सेक्स ९३,०००-१,०५००० पातळी दाखवेल. त्यामुळे जे समभाग आता यावेळी योग्य पातळीवर दिसून येत आहेत ते सुचवीत असून आपल्या सल्लागाराची मदत घेऊन त्यात गुंतवणूक करावी.

आज, सोमवारी बाजार कसा उघडतो, हे पाहणे आता महत्त्वाचे आहे. मागील आठवड्याप्रमाणे तेजी राहते की, पुन्हा निर्देशांक आणि समभाग मूल्य एकमेकांना सांभाळून घेतात का हे पाहावे लागेल. वरील समभाग किंवा त्या क्षेत्रातील अजूनही काही समभाग गुंतवणूकदार वेगळा पर्याय म्हणून पाहू शकतात. सध्याचा कल बघता येणारा आणि पुढील आठवडा बाजार तेजी धरून ठेवील. परदेशी वित्तसंस्था काय करतात हे पाहणेही व्यावहारिक ठरेल. आपण दीर्घ मुदतीचे गुंतवणूकदार असाल तर योग्य अभ्यास आणि समभागांच्या व्यवसायाची माहिती, दूरगामी धोरण आणि बाजारात उभे राहायची आपली ताकद हे सगळे जुळून आल्यास तेजीचा वारू जोरदार नफा देईल.

शेअर बाजारांमध्ये एफपीआयचे पुनरागमन

नवी दिल्ली : गेल्या दोन महिन्यांतील प्रचंड विक्रीनंतर, विदेशी गुंतवणूकदारांनी (एफपीआय) डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात २४,४५४ कोटी रुपयांच्या निव्वळ गुंतवणुकीसह भारतीय शेअर बाजारांत पुनरागमन केले आहे. तज्ज्ञांच्या मते, जागतिक स्थिरता आणि यूएस फेडरल रिझर्व्हच्या व्याजदरात कपातीच्या शक्यतेमुळे हे घडले. यापूर्वी, विदेशी गुंतवणूकदारांनी नोव्हेंबरमध्ये २१,६१२ कोटी आणि ऑक्टोबरमध्ये ९४,०१७ कोटी रुपये काढले होते.

कर्म कोणते... अन् हिशेब कसला?

विनायक कुळकर्णी

माधव श्रीच्या केबिनमध्ये घाईघाईत अवतरतो. 'अरे, माधवा, चक्क या वेळेला आपले दर्शन! बसा! चहा सांगतो', श्री उद्गारला. 'मित्रा, आज जर तू मला नीट सल्ला दिला नाहीस, तर बघ. देव तुला कधीच माफ करणार नाही', माधव श्रीच्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवत सांगतो.

'अरे यार, मला काहीच माहीत नसताना देवाची भीती घालू नकोस. लवकर काय ते सांग', श्री वैतागून बोलला.

'अरे, एका अनैतिक संबंधातून एक मुलगा जन्माला आला आणि तो मुलगा आता बारावीला आहे. त्याच्या मूळ बापाने आता त्याच्या शिक्षणाचा दर वर्षी खर्च देता येणार नाही, असे सांगून पाठ फिरवली. मग त्या मुलाची आई आमच्या संस्थेकडे मदत मागायला आली. मी त्या बापाशी बोललो तेव्हा कळलं की, त्याच्या घरी या अनैतिक संबंधांची काहीच माहिती नाही. आता या माणसाची बायपास झाली आहे. त्यामुळे तो आता आर्थिकदृष्ट्या खचला आहे. शेवटी एकरकमी तडजोड करूया म्हणाला. त्याने म्हटले आहे की, त्या मुलाच्या पदवीपर्यंतच्या खर्चाचा अंदाज सांगा तेवढी रक्कम तो नक्की देईल. म्हणून तुझ्याकडे आलोय हा अंदाज काढायला', माधवने एका दमात सर्व सांगून टाकलं.

'माधव, माझं डोकं खाण्यापेक्षा एखादा वकील पकडून न्यायालयात का नाही जात', श्रीने विचारलं.

'अरे, तो पर्यायही सांगून झाला; परंतु आई आणि मुलगा दोघेही यासाठी तयार नाहीत. ते म्हणतात, कोर्टकज्जात किती वर्षे जातील ते देवच जाणो.' माधवच्या या उद्गारावर श्री डोक्याला हात लावत बोलला, 'समाजात असेही लोक आहेत. अन्याय होऊनही सहन करत असतात. तो मुलगा बारावी कॉमर्सला आहे. त्यामुळे समज त्याने पदवी शिक्षण घेताघेता सीए, सीएस, सीएमए, एमबीए किंवा सीएफए यांसारखे व्यावसायिक अभ्यासक्रम घेतले, तर त्यासाठी क्लासला जाणार त्याचा खर्च, शिवाय पुस्तकांचा खर्च करावा लागेल. शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिवर्ष किमान दहा टक्के दराने चलनवाढ लक्षात घेता हा खर्च लाखाच्या घरात असणार आहे. त्यामुळे त्या मुलाचे वडील जेवढी रक्कम देऊ करीत आहेत, ती किमान किती असली पाहिजे याचा नेमका अंदाज आपल्याला देता आला पाहिजे. प्रतिवर्ष एक लाख रुपये विद्यमान खर्च गृहित धरला, तर दहा टक्के चलनवाढीमुळे भविष्यात पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षासाठी अनुक्रमे १.१० लाख, १.२१ लाख आणि १.३३ लाख रुपये याप्रमाणे एकूण ३.६४ लाख रुपयांची किमान गरज भासणार आहे. त्याशिवाय अतिरिक्त संगणकीय कौशल्ये विकसित करण्याच्या खर्चासाठी किमान एक लाख रुपये लक्षात घेऊन साधारणपणे साडेचार ते पाच लाख रुपयांची मागणी करावी. उगाचच तोंडात येईल तो आकडा न सांगता असा चलनवाढीमुळे वाढलेला हिशेब दिल्यावर ती व्यक्तीही तयार होईल.'

श्रीच्या या सविस्तर बोलण्यावर माधव खुश होऊन म्हणाला, 'यासाठीच तुझ्याकडे आलो.'

'माधव खरं सांगू, तुझ्यामुळे समाजात असेही आगळेवेगळे प्रश्न असतात आणि त्यांची उत्तरे मात्र परिस्थितीजन्य असली, तरीही ती शोधता आल्याचा आनंद अधिक असतो. आता हा अनुभव कायद्याच्या कक्षात बसवायला जावे तर जटील बनणार. कायद्यात न बसता सोडवायचा तर कदाचित पटकन सुटणार. आर्थिक प्रश्न सोडवताना भावना बाजूला ठेवून व्यवहार बघावा लागतो याची अनुभूती प्राप्त होत असते', हे बोलत श्रीनेच माधवला नमस्कार केला आणि म्हणाला, 'माधव, खूप खूप धन्यवाद!'

आमखास मैदानावर एज्युकेशन एक्स्पो

१५ डिसेंबरपासून विविध कार्यक्रम

म. टा. प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर

'माइंडस इन मोशन फाउंडेशन'च्या वतीने एमजीएम विद्यापीठ; तसेच जामिया महंमदिया एज्युकेशन सोसायटी यांच्या सहकार्याने एज्युकेशन एक्स्पो भरविण्यात येत आहे. आमखास मैदान येथे भरविण्यात येणाऱ्या या एक्स्पोला मोठा प्रतिसाद मिळाला होता. यंदाच्या वर्षी या एक्स्पोला भेट देणाऱ्यांची संख्या सहा लाखापेक्षा अधिक असेल, असा विश्वास एक्स्पोचे संयोजक बासित सिद्दीकी यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

एज्युकेशन एक्स्पोबाबत माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत बासित सिद्दीकी यांच्यासह आदिल अजीज सिद्दीकी, सफर खान, सुलेनमान शाहीन, नोमान सौदागर यांची उपस्थिती होती. सिद्दीकी म्हणाले, 'दोन वर्षांपासून माइंडस इन मोशन फाउंडेशनच्या वतीने शहरात एज्युकेशन एक्स्पो घेण्यात येत आहे. २०२४च्या एज्युकेशन एक्स्पोचे उदघाटन एमजीएम विद्यापीठाचे कुलपती तसेच एमजीएम मिशन ट्रस्टचे सचिव अंकुशराव कदम यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी महापालिकेचे आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासह ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डचे सचिव मौलाना उमरैन महेफुज रहेमानी, जामीया इस्लामिया इशाउल्लाह उलुम अक्कलकुवॉ चे अध्यक्ष मौलाना हुजैफा वस्तानवी यांच्यासह इस्लामिक रिसर्च सेंटरचे अध्यक्ष ॲड. फैज सय्यद यांची उपस्थिती राहणार आहे. उद्घाटन कार्यक्रमानंतर उपस्थिती मान्यवर हे 'देशातील प्रत्येकांसाठी वाजवी दरात शिक्षण' या विषयावर आपले मत मांडणार आहे. याशिवाय या एज्युकेशन एक्स्पोमध्ये विविध विषयांवर मान्यवर प्रतिक्रिया मांडणार आहे. या एक्स्पोमध्ये केरॉन वैष्णव, सुरत येथील गोपीनाथ केमीकलचे आमिर नुरूल, दक्षिण अफ्रिकेतून इद्रीस खमानीसा, मंजूश्री लांडगे, तसेच सुरैन कोलकानकर, रविशंकर कुमार; तसेच सेंट लुईस वॉशिंग्टन विद्यापीठ येथील डॉ. सफदर खुदूस यांच्यासह महावितरण सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता यांचीही उपस्थिती असेल.

यंदाच्या एक्स्पोमध्ये एकूण १३७ दुकाने राहणार आहेत. यात पुस्तकांच्या विक्रीची स्टॉल असणार आहे. याशिवाय जेवणासाठी स्टॉलसह विविध कंपन्यांच्या तसेच संस्थांचेही स्टॉल लावण्यात येणार आहे.

महापालिकेचा वर्धापनदिन उत्साहात

म. टा. प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर

महानगरपालिका वर्धापन दिन रविवारी साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांची सुरुवात करण्यात आली.

वर्धापन दिनानिमित्त महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून विविध कार्यक्रमांची सुरुवात करण्यात आली. या वेळी आयुक्त जी. श्रीकांत, सहायक आयुक्त अशोक गिरी, उपायुक्त रवींद्र जोगदंड, उपसंचालक मनोज गर्जे, सांस्कृतिक कार्य अधिकारी शंभू विश्वासू, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, ए. बी. देशमुख, बी. डी. फड, बी. के. परदेशी आदींची उपस्थिती होती. या वेळी रवींद्र खरात, संतोष कोठाळे, अतुल बनकर, करण साळवे, सर्जेराव राऊत आदी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

महापालिकेच्या ताफ्यातील वाहनांचे संचलन

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या सेवेतील वाहनांचे शहरात संचलन करण्यात आले. महापालिकेच्या सेंट्रल नाका येथील यांत्रिकी विभाग येथून संचलनाला सुरुवात झाली. संचलनात महापालिकेतील तीस प्रकारच्या वाहनांचा समावेश होता.

नितीन भैय्या देशमुख
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
सौजन्य:-हरमुकुंद कन्स्ट्रक्शन

TATA POWER DELHI DISTRIBUTION LIMITED
A Tata Power and Delhi Government Joint Venture
TATAPOWER-DDL
Regd. Office : NDPL House, Hudson Lines, Kingsway Camp, Delhi 110 009
Tel : 66112222, Fax : 27468042, Email : TPDDL@tatapower-ddl.com
CIN No. : U40109DL2001PLC111526, Website : www.tatapower-ddl.com

CORRIGENDUM / TENDER DATE EXTENTION Dec 09, 2024

Tender Enquiry No. Work Description	Previously Published Date	Revised Due Date & Time of Bid Submission/ Date & time of opening of bids
TPDDL/PMG/Tender/Banking-2024/02 Notice Inviting bids for banking of up to 100 MW RTC / Slot-wise power on firm basis for the period of 01.12.24 to 30.09.25.	23.11.2024	20.12.2024 at 1500 Hrs/ 20.12.2024 at 1530 Hrs

Complete tender and corrigendum document is available on our website **www.tatapower-ddl.com** → Vendor Zone → Tender / Corrigendum Documents
Contracts - 011-66112222

IL&FS
Invitation for Expression of Interest

Date: December 09, 2024

Assignment of Non-Performing Asset Accounts of IL&FS Financial Services Limited

Binding Bids are invited from eligible entities for the transfer by way of assignment of 4 (four) loan facilities of SKIL Infrastructure Limited ("**SIL**"), Gujarat-Dwarka Portwest Limited ("**GDPL**") and SKIL-Himachal Infrastructure And Tourism Limited ("**SHITL**") (collectively, "**SKIL Group**") by IL&FS Financial Services Limited ("**IFIN**"), each on an "as is where is" basis and "as is what is" basis for a full upfront cash consideration (100% cash consideration) basis (together, referred to as the "**Potential Transaction**").

IFIN a registered NBFC which is registered with the Reserve Bank of India ("**RBI**"), sanctioned four term loan facilities ("**Facilities**") to the SKIL Group and as of November 30, 2024 the total outstanding amount inclusive of interest and other charges is INR 2,023.54 crores (Indian Rupees Two Thousand Twenty Three Crores Fifty Four Lakhs Only). These Facilities have been classified as non-performing assets (NPAs) by IFIN as on February 28, 2017 for SIL and GDPL, and on May 26, 2017 for SHITL in compliance with the directives/guidelines issued by the RBI.

Kroll has been appointed as financial and transaction advisor for the Proposed Transaction.

Eligible bidders may refer to https://www.ilfsindia.com/asset-divestment.aspx for the format of the Non-Disclosure Undertaking ("**NDU**"), Eligibility Criteria and other terms and conditions. Executed NDU's can be submitted on and from **December 09, 2024, till January 10, 2025**, by email. Pursuant to the submission of the NDU, the data room can be accessed. Submission of the executed NDU and/or any queries with respect to the process shall be made by email to ilfs.ifinloans@ilfsindia.com with a copy to ilfs.skil@kroll.com. Emails should clearly set out the subject as "Assignment of Non-Performing Asset Accounts related to SKIL Group". The binding bid due date shall be **January 28, 2025**, latest by **5 P.M Indian Standard Time**. Consummation of the Potential Transaction is subject to necessary internal and external approvals.

IL&FS Group reserves the right to suspend, terminate or modify the Potential Transaction and/or its terms at any time, in each case, without providing any reasons or incurring any liability whatsoever.

http://www.ilfsindia.com

महाराष्ट्र टाइम्स वर्धापन दीनामनिमित्त हार्दीक शुभेच्छा

Municipal Council Sillod Dist.Ch sambhajinagar
नगर परिषद सिल्लोड जि. छ.संभाजीनगर
Email- cosillod@gmail.com
Ph.02430-222467
जा.क्र.नपसि/कावि/घ.व्य./२०२४
दि.०५/१२/२०२४

जाहीर सूचना

या जाहिर सुचने द्वारे सिल्लोड नगरपरिषद हद्दीतील सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाने अधिसुचना क्र. एसओ१३५७ (ई) दि.०८.०४.२०१६ अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम लागु केले आहेत. या नियमांची अंमलबजावणी शहरामध्ये प्रभावीपणे चालु आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रभावी करणेकामी शासनाने निश्चित केलेले युजर्स चार्जेसची आकारणी व वसुली करण्यात येत आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या तरतुदींचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती/संस्थांना दंड करण्याचे (Spot Fine) अधिकार नगरपरिषद / नगरपंचायतींना शासन निर्णय क्र. स्वमअर०१७/प्र.क्र.२५६(१)/ नवि-३४ नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक ०७ सप्टेंबर २०१८ अन्वये प्रदान करण्यात आले आहेत.

त्यास अनुसरून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती/संस्थांकडुन खालील प्रमाणे दंडणीय रक्कम वसुल करण्यात येत आहे. दंडाचे जोडपत्र

अ.क्र	कृती/बाब	दंड रक्कम
१	रस्ते मार्गावर घाण करणे	१५०
२	मिक्स कचरा देणे	५००
३	उडघड्यावर कचरा टाकणे	१०००
४	सार्वजनिक ठिकाणी थुंकणे	५००
५	उडघड्यावर लघवी/लघुशंका करणे	५००
६	उघड्यावर शौच करणे	५००
७	प्लास्टीक वापर केल्यास दंड	५०००
८	बांधकाम मटेरीयलं (C&D) प्रति खेप	२५०

तरी सिल्लोड नगरपरिषद हद्दीतील नागरीकांनी याची नोंद घेऊन घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्य करावे.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगरपरिषद, सिल्लोड

CCI NG 3.7 Product: MTMumbaiBS PubDate: 09-12-2024 Zone: Mumbai Edition: 1 Page: MTM7 User: c-sandeep.thalkar Time: 12-08-2024 22:52 Color:

टीजेएस्बी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
www.tjsbbank.co.in
Toll Free: 1800 266 3466 / 1800 223 466
*अटी लागू

ज्येष्ठांनो, असा वाचवा कर

चित्र : एआय

जोडोनिया 'कर'

सीए संजीव गोखले

ज्येष्ठनागरिकांना प्राप्तिकर भरताना करमुक्त उत्पन्न मर्यादा अधिक होती. तसेच काही गुंतवणूक केल्यास वजावटीही मिळत होत्या. त्यामुळे करबचत करणे शक्य होते. पण आता नव्या कर पर्यायात वजावटी नाहीत. मग कसा वाचवायचा कर? ते आता पाहू.

सुधारित नव्या कर पर्यायात कराचे दर आणि स्लॅब असे आहेत की, जुन्या कर पर्यायात मिळणाऱ्या साधारण ४ लाखापर्यंतच्या वजावटी नाही मिळाल्या तरी नव्या कर पर्यायात कमी कर भरावा लागतो. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना जुन्या कर पर्यायात मिळणाऱ्या बँकेच्या व्याजवरील रु. ५०००० वजावट, वैद्यकीय विम्यात रु. ५००००, कलम ८०सी अंतर्गत दीड लाख वजावट, इत्यादी एकत्रित घेतल्या तरी नवीन कर पर्यायात कर कमी लागेल. याचा अर्थ करबचत करण्यासाठी आता गुंतवणूक करणे जरुरीचे नाही. फक्त नवा कर पर्याय स्वीकारायचा.

नवा कर पर्याय स्वीकारून कर कमी भरता येईल, पण या व्यतिरिक्तही काही करबचत शक्य आहे का? असा प्रश्न नेहमी विचारला जातो. त्यासाठी जे कर नियोजन करता येईल त्याचा विचार करू. सर्व प्रथम म्हणजे म्युच्युअल फंडात गुंतवणूक असेल तर नियमित उत्पन्न लाभांश स्वरूपात न घेता ठराविक युनिट्स दर महिन्याला विकून पैसे खात्यात जमा होतील, असा पर्याय निवडा. याला सिस्टीमॅटिक विड्रॉवल प्लान (एसडब्ल्यूपी) असे म्हणतात. यात इक्विटी फंडात वार्षिक १,२५,००० नफा करमुक्त आहे. त्यामुळे मूळ करमुक्त उत्पन्नाच्या ३ लाख या मर्यादेच्या वर सव्वा लाख रुपये करमुक्त होतील. पती-पत्नी दोघेही ही सवलत घेऊ शकतात.

ज्यांची म्युचुअल फंडात गुंतवणूक नाही, पण शेअर्समध्ये आहे आणि त्यात चांगला नफा झालेला असेल, तर तेही ठराविक शेअर्स विकून वरीलप्रमाणे सव्वा लाख करमुक्त भांडवली नफा मिळवून दर महिन्याला लागणारे पैसे कमवू शकतात.

करमुक्त व्याज मिळणारे रोखे नेहमी बाजारात उपलब्ध असतात. त्यात गुंतवणूक करा. यामुळे मिळणारे व्याज साधारण बँकेतील व्याजाएवढे असले तरी कर लागत नाही. शिवाय हे रोखे बाजारात खरेदी करताना जास्त रक्कम द्यावी लागते. रोखे मुदत संपल्यावर कमी रक्कम मिळाली तर झालेले नुकसान मिळणाऱ्या करमुक्त व्याजाच्या तुलनेत खूपच कमी असते. तसेच हे नुकसान इतर भांडवली नफ्यासमोर समायोजित करता येते व कर वाचवता येतो. ज्येष्ठ नागरिकांना पगाराचे उत्पन्न नसल्याने या पर्यायाचा उत्तम उपयोग करता येईल.

याशिवाय करबचत होणार नसली तरी 'पीपीएफ'मध्ये गुंतवणूक करावी. यात मिळणारे व्याज करमुक्त असते. गरज लागेल तसे काही पैसे 'पीपीएफ'मधून काढता येतील. या रकमेवर कोणताही कर भरावा लागत नाही. तसेच राष्ट्रीय पेन्शन योजनेत गुंतवणूक केल्याने मुदतीनंतर मिळणारी ६० टक्के रक्कम करमुक्त असते. याशिवाय दरमहा पेन्शनही मिळेल.

ज्येष्ठ नागरिकांना नातवंडे असतील आणि ती १८ वर्षांच्या वर असतील तर त्यांच्या नावे पैसे गुंतवल्यास उत्पन्न त्या नातवंडांचे म्हणून धरले जाईल. ती कमवायला लागेपर्यंत त्यांनाही कर लागणार नाही. तसेच काही प्रमाणात संपत्ती विभाजन करण्याची सुरुवात करता येईल. अर्थात यासाठी परस्पर विश्वास आणि सामंजस्य आवश्यक आहे.

बाजार धरून ठेवेल तेजी

चित्र : एआय

गेल्या आठवड्यातील काही बातम्यांनी सर्वांच्या मनात थोडी काळजी म्हणा किंवा चिंता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्या सर्वच बातम्या या प्रामुख्याने भारताच्या आर्थिक क्षेत्राशी निगडित होत्या. त्यानंतर शुक्रवारी जाहीर झालेल्या द्विमासिक आर्थिक धोरणाने त्या सर्व बातम्यांना दुजोरा दिला. त्यामुळे या सर्वांची नोंद घेत मुंबई आणि राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक ८१,७०९ (-५६) / २४,६७७ (-३०) असा नकारात्मक बंद झाला. त्या महत्त्वाच्या नोंदी खाली देत आहे...

जादूचा दिवा

केदार ओक
सेबी नोंदणी क्रमांक INH000001055

- सेवा क्षेत्रातील वाढीचा वेग मंदावला
- रुपया आणखी खोलात
- देशावरील बाह्यकर्ज ६४७ अब्ज डॉलरवर
- अन्नधान्याचा वाढता महागाई दर
- अर्थव्यवस्था वाढीचा दर ७.२ टक्क्यांवरून ६.६ टक्क्यांवर घसरण्याची शक्यता
- रेपो रेट कमी न करता सीआरआरमध्ये चार वर्षांनंतर कपात
- अर्थमंत्र्यांनी केलेला शाब्दिक खेळ (दुसरी सहामाही सिस्टीमॅटिक स्लो डाउन दाखवत नसून फक्त वाढीव मागणीत घट दाखवत आहे)
- वायओवाय बेसिसप्रमाणे वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनात ८.५ टक्के वाढ

कंपनीचे नाव	सध्याचा भाव (रुपये)	५२ आठवडे अपेक्षित	भाव (रुपये)	कालावधी कमाल/किमान
आरव्हीएनएल	४६४	६४७/१६५	६००	३-६ महिने
भारत फोर्ज	१,३५५	१८२६/१०६३	१,८५०	६-९ महिने
प्रेस्टिज	१,७३८	२०७२/९६८	२,२००	३-६ महिने
चोला इन्व्हेस्ट फायनान्स	१,२७५	१६५०/१०११	१,५००	१-६ महिने
स्टेट बँक ऑफ इंडिया	८६४	९१२/६००	१,१००	६-१२ महिने

या बातम्यांनंतर मागील आठवड्यात बाजारातील हालचालीवर लक्ष टाकल्यास असे लक्षात येईल की, या सर्वांची बाजाराला पूर्वकल्पना आली होती. त्यामुळे या बातम्यांपूर्वीच बाजाराने गेल्या दीड महिन्यात १० टक्के करेक्शन देऊन समतोल साधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वरील बातम्यांनंतर चार दिवस तेजी दाखवून बाजार एकच दिवस खाली आला. मागील आठवड्यात पुन्हा एकदा संरक्षण, रिअल इस्टेट, बँक आणि रेल्वे क्षेत्रात बरीच उलाढाल दिसून आली. दुसरी महत्त्वाची गोष्ट बाजारात दिसून आली ती म्हणजे, परदेशी वित्तसंस्था बाजारात करत असलेली खरेदी. गुंतवणूकदारांनी डिसेंबर २४च्या आकडेवारीवर नजर टाकल्यास हे लक्षात येईल. त्यामुळे बाजार ठराविक पातळी धरून आहे. त्याच सुमारास मॉर्गन स्टॅनली आणि एका परदेशी वित्तसंस्थेने बाजाराबद्दल केलेले भाकीत. ते म्हणजे, पुढील वर्षी २०२५च्या अखेरीस सेन्सेक्स ९३,०००-१,०५००० पातळी दाखवेल. त्यामुळे जे समभाग आता यावेळी योग्य पातळीवर दिसून येत आहेत ते सुचवीत असून आपल्या सल्लागाराची मदत घेऊन त्यात गुंतवणूक करावी.

आज, सोमवारी बाजार कसा उघडतो हे पाहणे आता महत्त्वाचे आहे. मागील आठवड्याप्रमाणे तेजी राहते की, पुन्हा निर्देशांक आणि समभाग मूल्य एकमेकांना सांभाळून घेतात का हे पाहावे लागेल. वरील समभाग किंवा त्या क्षेत्रातील अजूनही काही समभाग गुंतवणूकदार वेगळा पर्याय म्हणून पाहू शकतात. सध्याचा कल बघता येणारा आणि पुढील आठवडा बाजार तेजी धरून ठेवील. परदेशी वित्तसंस्था काय करतात हे पाहणेही व्यावहारिक ठरेल. आपण दीर्घ मुदतीचे गुंतवणूकदार असाल तर योग्य अभ्यास आणि घेतलेल्या समभागांच्या व्यवसायाची माहिती, त्याचे दूरगामी धोरण आणि बाजारात उभे राहायची आपली ताकद हे सगळे जुळून आल्यास तेजीचा वारू जोरदार नफा देईल.

कर्म कोणते... अन् हिशेब कसला?



चित्र : एआय

फॅमिली बजेट

विनायक कुळकर्णी

माधव श्रीच्या केबिनमध्ये घाईघाईत अवतरतो. 'अरे, माधवा, चक्क या वेळेला आपले दर्शन! बसा! चहा सांगतो', श्री उद्गारला. 'मित्रा, आज जर तू मला नीट सल्ला दिला नाहीस तर बघ. देव तुला कधीच माफ करणार नाही', माधव श्रीच्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवत सांगतो.

'अरे यार, मला काहीच माहीत नसताना देवाची भीती घालू नकोस. लवकर काय ते सांग', श्री वैतागून बोलला.

'अरे, एका अनैतिक संबंधातून एक मुलगा जन्माला आला आणि तो मुलगा आता बारावीला आहे. त्याच्या मूळ बापाने आता त्याच्या शिक्षणाचा दरवर्षी खर्च देता येणार नाही असे सांगून पाठ फिरवली. मग त्या मुलाची आई आमच्या संस्थेकडे मदत मागायला आली. मी त्या बापाशी बोललो तेव्हा कळलं की, त्याच्या घरी या अनैतिक संबंधाची काहीच माहिती नाही. आता या माणसाची बायपास झाली आहे. त्यामुळे तो आता आर्थिकदृष्ट्या खचला आहे. शेवटी एकरकमी तडजोड करूया म्हणाला. त्याने म्हटले आहे की, त्या मुलाच्या पदवीपर्यंतच्या खर्चाचा अंदाज सांगा तेवढी रक्कम तो नक्की देईल. म्हणून तुझ्याकडे आलोय हा अंदाज काढायला', माधवने एका दमात सर्व सांगून टाकलं.

'माधव, माझं डोकं खाण्यापेक्षा एखादा वकील पकडून न्यायालयात का नाही जात', श्रीने विचारलं.

'अरे, तो पर्यायही सांगून झाला; परंतु आई आणि मुलगा दोघेही यासाठी तयार नाहीत. ते म्हणतात, कोर्टकज्जात किती वर्षे जातील ते देवच जाणो.' माधवच्या या उद्गारावर श्री डोक्याला हात लावत बोलला, 'समाजात असेही लोक आहेत. अन्याय होऊनही सहन करत असतात. तो मुलगा बारावी कॉमर्सला आहे. त्यामुळे समज त्याने पदवी शिक्षण घेता घेता सीए, सीएस, सीएमए, एमबीए किंवा सीएफए यांसारखे व्यावसायिक अभ्यासक्रम घेतले तर त्यासाठी क्लासला जाणार त्याचा खर्च, शिवाय पुस्तकांचा खर्च करावा लागेल. शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिवर्ष किमान दहा टक्के दराने चलनवाढ लक्षात घेता हा खर्च लाखाच्या घरात असणार आहे. त्यामुळे त्या मुलाचे वडील जेवढी रक्कम देऊ करीत आहेत ती किमान किती असली पाहिजे याचा नेमका अंदाज आपल्याला देता आला पाहिजे. प्रतिवर्ष एक लाख रुपये विद्यमान खर्च गृहित धरला, तर दहा टक्के चलनवाढीमुळे भविष्यात पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षासाठी अनुक्रमे १.१० लाख, १.२१ लाख आणि १.३३ लाख रुपये याप्रमाणे एकूण ३.६४ लाख रुपयांची किमान गरज भासणार आहे. त्याशिवाय अतिरिक्त संगणकीय कौशल्ये विकसित करण्याच्या खर्चासाठी किमान एक लाख रुपये लक्षात घेऊन साधारणपणे साडेचार ते पाच लाख रुपयांची मागणी करावी. उगाचच तोंडात येईल तो आकडा न सांगता असा चलनवाढीमुळे वाढलेला हिशेब दिल्यावर ती व्यक्तीही तयार होईल.' श्रीच्या या सविस्तर बोलण्यावर माधव खुश होऊन म्हणाला, 'यासाठीच तुझ्याकडे आलो.'

'हो ना? मग आता तुझ्या देवाला सांग मला माफ करायला! माधव खरं सांगू, तुझ्यामुळे समाजात असेही आगळेवेगळे प्रश्न असतात आणि त्यांची उत्तरे मात्र परिस्थितीजन्य असली तरीही ती शोधता आल्याचा आनंद अधिक असतो. काही महिन्यांपूर्वी तू पारलिंगी पाठवला होतास माझ्याकडे. आता हा अनुभव कायद्याच्या कक्षात बसवायला जावे तर जटील बनणार आणि कालपव्यय होणार. कायद्यात न बसता सोडवायचा तर कदाचित पटकन सुटणार. शेवटी आर्थिक प्रश्न सोडवताना भावना बाजूला ठेवून व्यवहारच बघावा लागतो याची अनुभूती प्राप्त होत असते', हे बोलत श्रीनेच माधवला नमस्कार केला आणि म्हणाला, 'माधव, खूप खूप धन्यवाद!'

शेअर बाजारांमध्ये एफपीआयचे पुनरागमन

नवी दिल्ली : गेल्या दोन महिन्यांतील प्रचंड विक्रीनंतर, विदेशी गुंतवणूकदारांनी (एफपीआय) डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात २४,४५४ कोटी रुपयांच्या निव्वळ गुंतवणुकीसह भारतीय शेअर बाजारांत पुनरागमन केले आहे. तज्ज्ञांच्या मते, जागतिक स्थिरता आणि यूएस फेडरल रिझर्व्हच्या व्याजदरात कपातीच्या शक्यतेमुळे हे घडले. यापूर्वी, विदेशी गुंतवणूकदारांनी नोव्हेंबरमध्ये २१,६१२ कोटी आणि ऑक्टोबरमध्ये ९४,०१७ कोटी रुपये काढले होते.

गेल्या वर्षभरात ६६ टक्के व्यावसायिकांकडून लाच

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

देशभरातील १५९ जिल्ह्यांतील सुमारे ६६ टक्के व्यावसायिकांनी मागील १२ महिन्यांत लाच दिल्याचे मान्य केल्याचे 'लोकलसर्कल्स' या ऑनलाइन प्लॅटफॉर्मच्या सर्वेक्षणात उघड झाल्याचे सांगण्यात आले.

या सर्वेक्षणात १८ हजार व्यावसायिकांकडून प्रतिसाद मिळाला. त्यातील ५४ टक्के जणांना लाच देण्यास भाग पाडले गेले, तर ४६ टक्के जणांनी प्रक्रिया जलद करण्यासाठी स्वेच्छेने लाच दिली. 'सरकारी विभागांकडून परवानगी मिळवण्यासाठी किंवा मंजुरीची प्रक्रिया जलद होण्यासाठी लाच देणे, इतकेच नव्हे तर परवान्याची दुय्यम प्रत किंवा मालमत्तेशी संबंधित कोणत्याही बाबीसाठी लाच देणे म्हणजे जीवनाचा एक भागच झाला आहे', असे अनेक व्यावसायिकांनी खासगीत सांगितले. या सर्वेक्षणानुसार, गेल्या १२ महिन्यांत ६६ टक्के व्यावसायिकांनी लाच दिली. अवघ्या १६ टक्के व्यावसायिकांनी लाच न देता काम पूर्ण करवून घेतले आणि १९ टक्के जणांना लाच देण्याची गरजच भासली नाही, असे आढळून आले.

स्वप्नपूर्ती गृह कर्ज
घर खरेदीसाठी रू. 1.40 कोटींपर्यंत
व्याज दर 7.50%*

उद्योग धंद्यासाठी सुलभ कर्ज
रू. 25 लाखांपर्यंत व्याजदर 8.50%*
रू. 25 लाखांपुढे व्याजदर 9.50%*

सुखदायी वैयक्तिक कर्ज
रू. 5 लाखांपर्यंत
व्याज दर 13%*

मनोरथ वाहन कर्ज
वाहन खरेदीसाठी 100% कर्ज
व्याज दर 7.75%*

सोने तारण कर्ज
रू. 25 लाखांपर्यंत
व्याज दर 7.95%*

ज्ञानवर्धिनी (शैक्षणिक कर्ज)
व्याज दर 8.50%*

NSC, KVP, LIC यावर कर्ज
व्याज दर 8.75%*

*अटी लागू

ठाणे भारत सहकारी बँक लि. शेड्यूल्ड बँक
केंद्रीय कार्यालय : सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ,
घंटाळी, नौपाडा, ठाणे.
संपर्क : 25408076 | 25447816 | 9619193016
• www.tbsbl.com

देश-विदेश

सीरियात बंडखोरांची सत्ता

(पान एकवरून)

गोळीबार करून, बंडखोरांचा सीरियन झेंडा घेऊन घोषणाबाजी करीत होते. असद यांनी इतक्या वेगाने सत्ता गमावल्याने दमास्कसमधील नागरिकांमध्ये आश्चर्याची भावना व्यक्त केली जात होती. बंडखोरांनी असद यांची सत्ता उलथवल्याचे जाहीर करताना कैद्यांचीही सुटका करण्यात आल्याचे सांगितले.

नागरी युद्धाआधी सीरियाची लोकसंख्या सुमारे दोन कोटी ३० लाख होती. मात्र, युद्धामुळे निम्मे लोक विस्थापित झाले आहेत. असद यांच्यावर युद्धगुन्हेगारीचा आरोप आहे. सन २०१३मध्ये दमास्कसजवळ रासायनिक शस्त्रांच्या वापरामुळे मानवतेविरूद्ध गुन्हा केल्याचा आरोपही त्यांच्यावर आहे. असद यांची राजवट संपुष्टात आल्याने इराण आणि त्यांच्या सहकारी देशांना धक्का बसल्याचे मानले जाते.

बंडखोरांच्या हयात तहरिर अल-शाम (एचटीएस) या संघटनेने उत्तर-पश्चिम सीरियातील मोठ्या प्रांतावर २०१७मध्ये सत्ता स्थापन केली. या संघटनेचा प्रमुख अबु महंमद अल-गोलानी हा अल-कायदाचा माजी कमांडर आहे. मात्र, या संघटनेशी संबंध तोडून आपण वैविध्य आणि धार्मिक सहिष्णुतेचा मार्ग निवडल्याचे त्याचे म्हणणे असून, स्वतःला उदारमतवादी नेता म्हणून प्रस्थापित करण्याचे त्याचे प्रयत्न आहेत. सीरियाला अनिर्बंध सत्ताधीशाची नव्हे, तर संस्थात्मक सरकारी यंत्रणेची आवश्यकता आहे, असे गोलानी याने गेल्या आठवड्यात म्हटले होते.

असद गेले कुठे?

सीरियातून पलायन करून बशर अल-असद कुठे गेले, याबाबत अद्याप कोणतीही स्पष्टता नाही. असद कुठे आहेत, याची कल्पना नसून, शनिवारपासूनच त्यांच्याशी संपर्क झालेला नसल्याचे सीरियाचे पंतप्रधान मोहम्मद गाझी जलाली यांनी सांगितले. विरोधकांकडे सत्तेचे हस्तांतरण करण्यास तयार असल्याचे एका व्हिडीओ निवेदनाद्वारे त्यांनी स्पष्ट केले. असाद यांनी बंडखोर गटांशी वाटाघाटी करून आणि शांततेच्या मार्गाने सत्ता हस्तांतरणाबाबत सूचना देऊन पलायन केले, असा दावा रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने केला आहे. असद यांनी रविवारी सकाळी दमास्कसमधून विमानाने पलायन केले, असे सीरियन ऑब्झरव्हेटरी फॉर ह्युमन राईटचे रामी अब्दुलरहमान यांनी माध्यमांना सांगितले. गेल्या काही वर्षांत आंतरराष्ट्रीय पातळीवरील बड्या नेत्यांना आश्रय देणाऱ्या संयुक्त अरब अमिरातीच्या एका वरिष्ठ राजनैतिक अधिकाऱ्याने याबाबत भाष्य करण्यास नकार दिला.

'सार्कचे हवे पुनरुज्जीवन'

काठमांडू : सामायिक हित आणि समृद्धी वाढविण्यासाठी सध्याच्या स्थितीत रखडलेल्या 'सार्क' परिषदेच्या प्रक्रियेचे पुनरुज्जीवन करण्याचे आवाहन नेपाळचे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांनी रविवारी केले. दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेच्या (सार्क) वर्धापनदिनानिमित्त दिलेल्या संदेशात ओली यांनी 'सार्क'च्या सदस्य देशांच्या सरकार आणि नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

सदस्य राष्ट्रांमध्ये परस्पर विश्वास, समजूतदारपणा आणि सहकार्य वाढविण्यात 'सार्क'ची प्रमुख भूमिका ओली यांनी अधोरेखित केली. शांततापूर्ण, समृद्ध आणि दक्षिण आशियाच्या विकासामध्ये नेपाळ कायमच महत्त्वाची भूमिका बजावेल, असेही ओली यांनी म्हटले आहे. नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयाने याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे. हवामान बदल, आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी यांसह सामाजिक-आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानांवर प्रकाश टाकून पंतप्रधान ओली यांनी 'सार्क' प्रक्रियेचे पुनरुज्जीवन करण्याचे आवाहन केले. सन २०१४ मध्ये काठमांडू येथे झालेल्या शेवटच्या परिषदेनंतर 'सार्क'ची द्विवार्षिक शिखर परिषद झाली नसल्याने सन २०१६ पासून 'सार्क' फारशी प्रभावी ठरलेली नाही, असेही नेपाळच्या पंतप्रधानांनी म्हटले आहे

विधानसभाध्यक्षपद पुन्हा नार्वेकरांकडे?

(पान एकवरून)

शिंदे-फडणवीस सरकारच्या अडीच वर्षांच्या काळात राहुल नार्वेकर यांच्याकडेच विधानसभेचे अध्यक्षपद होते. वकिली पेशा आणि कायद्याचे अभ्यासक असलेल्या नार्वेकरांकडील विधानसभा अध्यक्षपदाचा सत्ताधाऱ्यांना मोठा फायदा झाला. विशेषतः शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्षातील फुटीनंतर सुरू झालेल्या कायदेशीर लढाईत नार्वेकरांची वकिली कामी आली. सर्वोच्च न्यायालयाने मूळ शिवसेना आणि राष्ट्रवादीवरील दावेदारीचा निर्णय घेण्याची जबाबदारी विधानसभा अध्यक्षांकडे दिली. त्यानंतर, नार्वेकरांनी दोन्ही खटल्यांत प्रत्यक्ष सुनावणी घेत निकाल सुनावला. दरम्यान, राहुल नार्वेकर हे यंदा मंत्रिपदासाठी इच्छुक होते. मात्र, त्यांची विधानसभा अध्यक्षपदी वर्णी लागणार असल्याने भाजपकडून मुंबईतून कोणाला मंत्रिपद दिले जाते, याबाबत उत्सुकता आहे.

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
ई-निविदा सूचना

प्रधान मुख्य सिग्नल आणि दूरसंचार अभियंता **"कोकण रेल्वे मार्गावर कोलाड ते ठोकुर स्थानकादरम्यान कोकण रेल्वेच्या डार्क फायबरला तीन वर्षांसाठी भाड्याने देण्यासाठी"** पात्र बोलीदारांकडून ई-निविदा निविदा आमंत्रित करीत आहेत. **ई-निविदा क्र.:** के.आर./सी.ओ./एस.जी/ईटी/2024-03 **तारीख:** 09.12.2024. **बोली सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** 31/12/2024 रोजी 16:00 वाजेपर्यंत. **डार्क फायबरच्या सिंगल जोडीसाठी किमान राखीव किंमत:** ₹ 2,48,64,000/- (जीएसटी वगळून). अधिक तपशीलांसाठी कृपया भेट द्या: **www.ireps.gov.in**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
ई-निविदा आमंत्रण सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने, उप मुख्य अभियंता (कार्य), रत्नागिरी, खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून IREPS पोर्टलवर ई-निविदाद्वारे सिंगल पॅकेट बिड प्रणालीमध्ये खुली निविदा आमंत्रित करीत आहेत.

अनु. क्र. 1: कामाचे नाव: एसएसई/वर्क्स/रत्नागिरी विभागांतर्गत रत्नागिरी स्टेशनवर टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा. **निविदा सूचना क्र.:** केआर-आरएन-डीवाईसीईडब्ल्यू- वॉटर-2024-19 **दिनांक:** 09/12/2024. **एकूण अंदाजे मूल्य:** ₹:20,04,552.36/- (जीएसटी वगळून).

अनु. क्र. 2: कामाचे नाव: एसएसई/वर्क्स/माणगाव विभागांतर्गत कर्मचारी निवासस्थानांसह कोलाड, माणगाव आणि वीर स्टेशन्ससाठी टँकरद्वारे पिण्याच्या पाणीपुरवठा. **निविदा सूचना क्र.:** केआर-आरएन-डीवाईसीईडब्ल्यू-वॉटर-2024-18 **दिनांक:** 09/12/2024. **एकूण अंदाजे मूल्य:** ₹14,94,450/- (जीएसटी वगळून).

निविदेसाठी वरील सर्व समान: बोली सुरू होण्याची तारीख: 16/12/2024. **ऑनलाइन प्रस्ताव / बोली सादर करण्याची शेवटची तारीख / वेळ:** 30/12/2024 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्ण होण्याची कालावधी:** पावसाळ्यासह 5 महिने. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/ सहभागासाठी कृपया https://ireps.gov.in वेबसाइटला भेट द्या. शुद्धिपत्र/ परिशिष्ट फक्त या वेबसाइटवर प्रकाशित केले जाईल.

TATA POWER DELHI DISTRIBUTION LIMITED
A Tata Power and Delhi Government Joint Venture
TATA POWER-DDL
Regd. Office : NDPL House, Hudson Lines, Kingsway Camp, Delhi 110 009
Tel : 66112222, Fax : 27468042, Email : TPDDL@tatapower-ddl.com
CIN No. : U40109DL2001PLC111526, Website : www.tatapower-ddl.com

CORRIGENDUM / TENDER DATE EXTENTION Dec 09, 2024

Tender Enquiry No. Work Description	Previously Published Date	Revised Due Date & Time of Bid Submission/ Date & time of opening of bids
TPDDL/PMG/Tender/Banking-2024/02 Notice Inviting bids for banking of up to 100 MW RTC / Slot-wise power on firm basis for the period of 01.12.24 to 30.09.25.	23.11.2024	20.12.2024 at 1500 Hrs/ 20.12.2024 at 1530 Hrs

Complete tender and corrigendum document is available on our website **www.tatapower-ddl.com** → Vendor Zone → Tender / Corrigendum Documents
Contracts - 011-66112222

IL&FS
Invitation for Expression of Interest

Date: December 09, 2024

Assignment of Non-Performing Asset Accounts of IL&FS Financial Services Limited

Binding Bids are invited from eligible entities for the transfer by way of assignment of 4 (four) loan facilities of SKIL Infrastructure Limited ("**SIL**"), Gujarat-Dwarka Portwest Limited ("**GDPL**") and SKIL-Himachal Infrastructure And Tourism Limited ("**SHITL**") (collectively, "**SKIL Group**") by IL&FS Financial Services Limited ("**IFIN**"), each on an "as is where is" basis and "as is what is" basis for a full upfront cash consideration (100% cash consideration) basis (together, referred to as the "**Potential Transaction**").

IFIN a registered NBFC which is registered with the Reserve Bank of India ("**RBI**"), sanctioned four term loan facilities ("**Facilities**") to the SKIL Group and as of November 30, 2024 the total outstanding amount inclusive of interest and other charges is INR 2,023.54 crores (Indian Rupees Two Thousand Twenty Three Crores Fifty Four Lakhs Only). These Facilities have been classified as non-performing assets (NPAs) by IFIN as on February 28, 2017 for SIL and GDPL, and on May 26, 2017 for SHITL in compliance with the directives/guidelines issued by the RBI.

Kroll has been appointed as financial and transaction advisor for the Proposed Transaction.

Eligible bidders may refer to https://www.ilfsindia.com/asset-divestment.aspx for the format of the Non-Disclosure Undertaking ("**NDU**"), Eligibility Criteria and other terms and conditions. Executed NDU's can be submitted on and from **December 09, 2024, till January 10, 2025**, by email. Pursuant to the submission of the NDU, the data room can be accessed. Submission of the executed NDU and/or any queries with respect to the process shall be made by email to ilfs.ifinloans@ilfsindia.com with a copy to ilfs.skil@kroll.com. Emails should clearly set out the subject as "Assignment of Non-Performing Asset Accounts related to SKIL Group". The binding bid due date shall be **January 28, 2025**, latest by **5 P.M Indian Standard Time**. Consummation of the Potential Transaction is subject to necessary internal and external approvals.

IL&FS Group reserves the right to suspend, terminate or modify the Potential Transaction and/or its terms at any time, in each case, without providing any reasons or incurring any liability whatsoever.

http://www.ilfsindia.com